Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या जाहिरात परवाना, सिनेमा चित्रीकरण परवाना व व्यवसाय परवाना या ३ घटकांतर्गत येणाऱ्या सेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपीलीय अधिकारी लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांक:- संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २९ जानेवारी, २०२१.

<u>वाचा:-</u> (१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५.

(२) प्रधान सचिव (उद्योग), मंत्रालय, मुंबई यांचेद्वारे नगरविकास विभाग यांना साध्य करणेकरीता Ease of Doing Business State Reforms Action Plan (SRAP-२०२०) अंतर्गत वर्ग करण्यात आलेले रिफॉर्म्स.

(३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक संकीर्ण- २०१५/प्र.क्र.१८९/ नवि- १४, दिनांक २३/०६/२०१५.

(४) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/ नवि-२०, दिनांक २२/०८/२०१६.

(५) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३९८/ नवि- २०, दिनांक ०४/०९/२०१७.

(६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मातंस/जेव्ही-टिसीएस/ प्र.क्र.२०/३९ दनिांक १६/०९/२००८.

(७) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/ नवि-२०, दिनांक १४/०८/२०१९.

(८) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे पत्र क्र. नपप्रसं/का-०८/ई-गर्व्हनन्स/ EoDB/शासन निर्णय/२०२०/२८७९, दिनांक ०९.१२.२०२०.

**<u>प्रस्तावना</u>** :-

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ दि. २८.०४.२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. सदर अध्यादेशातील कलम-३ मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार या विभागाच्या प्रशासकीय अधिपत्याखालील राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदा / नगरपंचायती या नागरी संस्थामार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांपैकी नागरी केंद्रबिंदू मानून, नागरीकांना दैनदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असलेल्या १५ लोकसेवांची सुची शासन निर्णय, दि. २३.०६.२०१५ अन्वये निश्चित करण्यात आली आहे. तसेच केंद्र शासनाच्या Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्वाच्या

असलेल्या मालमत्ता कर, पाणी पुरवठा वसुली, ना हरकत प्रमाणपत्र व व्यवसाय परवाना या ४ घटकांतर्गत येणाऱ्या एकुण ३८ सेवांचा समावेश करण्याबाबत व सदर सेवांकरीता आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी तसेच प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादी बाबी दिनांक ०४.०९.२०१७ व २६.०८.२०१९ अन्वये अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरून राज्यातील बहुतांशी महानगरपालिका व नगरपरिषदा/नगरपंचायतींमधे विविध सेवा देण्यात येत आहेत.

०२. महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याच्या उदेशाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५, दि २१.०८.२०१५ च्या अधिसूचनेन्वये जारी करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या Ease of Doing Business च्या अनुषंगाने महत्वाच्या असलेल्या नवीन जाहिरात परवाना व सिनेमा चित्रीकरण परवाना या दोन घटकांतर्गत येणाऱ्या खालील सेवांचा समावेश करण्याबाबत व व्यवसाय परवाना या घटकांतर्गत येणा-या व्यवसाय परवाना स्वयं-नुतणीकरण (ऑटो रिन्युअल) ही नवीन सेवा व सदर सेवांकरीता आवश्यक कागदपत्रे, फी, नियतकालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी तसेच प्रथम व व्दितीय अपिलीय अधिकारी इत्यादी बाबी अधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय:-

राज्यातील सर्व महानगरपालिकांनी/ नगरपरिषदा/नगरपंचायती यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनिमय, २०१५ च्या कलम ३ नुसार अधिसूचित करावयाच्या आहेत.

**अ) जाहिरात परवाना अंतर्गत १ सेवा - विवरण पत्र "अ"**
**ब) सिनेमा चित्रीकरण परवाना अंतर्गत १ सेवा - विवरण पत्र क्र. "ब"**
**क) व्यवसाय परवाना अंतर्गत १ सेवा - विवरण पत्र "क"**

०२. शासन निर्णयासोबतच्या विवरण पत्र "अ", "ब" व "क" मधे नमूद केलेल्या सेवा, आवश्यक कागदपत्रे व नियत कालावधी यामधे संबधित सार्वजनिक प्राधिकरणांना (महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती) यांना बदल करता येणार नाही.

०३. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनिमय, २०१५ अंतर्गत सेवा पुरविण्याकरीता आकारावयाची फी निश्चित करण्याची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना मुभा राहिल. तसेच संबंधित नागरी स्थानिक संस्थेची रचना विचारात घेऊन पदर्निर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादी पदे संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांना सुधारणा करता यईल.

०४. राज्यातील सर्व आयुक्त,महानगरपालिका व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायती यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या कलम ३ नुसार सेवा अधिसुचित करणे व त्याची अंमलबजावणी करणेबाबतची कार्यवाही करावी.

**०५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०२१०१२९१४०४००४८२५ असा आहे. शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(शंकर त्र्यं. जाधव)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**

**प्रत,**

१. मा. विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा. राज्यपाल महोदय यांचे सचिव
४. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
५. सर्व मा. मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्य निवडणूक आयोग यांचे कार्यालय
७. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक
८. मा. लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय
९. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी
१०. मा. आयुक्त, राज्य मुख्य सेवा हक्क, निर्मळ इमारत, दुसरा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई,
११. राज्यातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
१२. आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
१३. राज्यातील संबंधित नगरपरिषदा / नगरपंचायती यांचे मुख्याधिकारी
१४. नगर विकास विभागातील सर्व कार्यासन
१५. निवडनस्ती (नवि-२०).

**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, सोबतचे सहपत्र- "अ"**

"जाहिरात परवाना"

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**

(**कलम ३ अन्वये महानगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**)

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | जाहिरात परवाना/ आकाशचिन्ह परवाना (Signange License) नवीन परवाना व नुतणीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | प्रभाग क्षेत्र अधिकारी | उपआयुक्त | अतिरीक्त आयुक्त |

**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, सोबतचे सहपत्र- "अ"**

"जाहिरात परवाना"

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**

(**कलम ३ अन्वये नगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**)

**अ, ब, क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती**

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | जाहिरात परवाना/ आकाशचिन्ह परवाना (Signange License) नवीन परवाना व नुतणीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प./न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, सोबतचे सहपत्र- “ब”**

**“सिनेमा चित्रीकरण परवाना”**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनिमय, २०१५**

**(कलम ३ अन्वये महानगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)**

| **अ.क्र.** | **लोकसेवेची सूची** | **आवश्यक कागदपत्रे** | **फी** | **नियत कालम र्यादा** | **पदनिर्देशित अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** | **द्वितीय अपिलीय अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie Shooting License) नवीन परवाना व नुतणीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | प्रभाग क्षेत्र अधिकारी | उपआयुक्त | अतिरीक्त आयुक्त |

**शासन निर्णय क्र.** संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, **सोबतचे सहपत्र- "ब"**

"सिनेमा चित्रीकरण परवाना"

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**

(**कलम ३ अन्वये नगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**)

**अ, ब, क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती**

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | सिनेमा चित्रीकरण परवाना (Movie Shooting License) नवीन परवाना व नुतणीकरण | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.पा./न.पं. ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यलय अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |

**शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, सोबतचे सहपत्र- "क"**

"व्यवसाय परवाना"

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५**

(**कलम ३ अन्वये महानगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**)

| अ.क्र. | लोकसेवेची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण (ऑटो-रिन्युअल) Auto-renewal of Trade License | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित म.न.पा.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | महानगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | प्रभाग क्षेत्र अधिकारी | उपआयुक्त | अतिरीक्त आयुक्त |

**शासन निर्णय क्र.** संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१८०/नवि-२०, **सोबतचे सहपत्र- "क"**

"व्यवसाय परवाना"

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनिमय, २०१५**

(**कलम ३ अन्वये नगरपालिकांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील**)

**अ, ब, क वर्ग नगरपरिषदा तसेच नगरपंचायती**

| **अ.क्र.** | **लोकसेवेची सूची** | **आवश्यक कागदपत्रे** | **फी** | **नियत कालमर्यादा** | **पदनिर्देशित अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** | **द्वितीय अपिलीय अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवसाय परवाना स्वयं-नुतनीकरण (ऑटो-रिन्युअल) Auto-renewal of Trade License | १. विहित नमुन्यातील अर्ज<br>२. संबंधित न.प./न.पं.ची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र | नगरपालिका स्तरावर निश्चित केलेले दर | १५ दिवस | कार्यालय अधिक्षक | उपमुख्याधिकारी | मुख्याधिकारी |